## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ एप्रिल — २०१९

दिनांक २५/०६/२०१९ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या हस्ते पोलीस क्लब, पहीला मजला, आझाद मैदान, मुंबई येथे आयोजीत करण्यात आलेल्या गुन्हे परिषदेत बक्षिस वितरण कार्यक्रमात सोबत जोडण्यात आलेल्या माहे **एप्रिल** —२०१९ या महिन्याचा **" BEST DETECTION OF THE MONTH "** चा पुरस्कार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आला आहे.

## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ एप्रिल — २०१९

| | | |
|---|---|---|
| ०१ | **काळाचौकी पोलीस ठाणे परिमंडळ—४** | **गु.र.क्र.७०/२०१९, कलम ३९४,३९५,३९७,४११,३४, १२० (ब) भादवि सह मुंपोका कलम ३७(१)(अ)/१३५, सह कलम ४, २५ भाहका.** |

**—: जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करुन दरोडा/जबरी चोरी :—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** फिर्यादी नामे श्री. अशोक मोहनलाल साकरीया, वय ५७ वर्षे, व्यवसाय—व्यापारारा.ठी. ए/१६०३, गुंदेचा गार्डन सोसायटी, चिंचपोकळी, मुंबई यांचे सोन्याचे—दागीने निर्मिती व विक्रीचा व्यवसाय असुन दिनांक ०६/०४/२०१९ रोजी रात्रौ ०९.५० वा.चे सुमारास चिंचपोकळी रेल्वे स्टेशन येथुन घरी पायी जात असतांना, चिंचपोकळी सार्वजनिक गणेशोत्सव मंडपाचे शेडजवळ आले असता यांतील अटक आरोपीत व पाहीजे आरोपीत यांनी आपसांत संगनमत करून जबरी चोरी करण्याचे इरादयाने तक्रारदार यांचे दोन्ही हातावर, खांदयावर लोखंडी चॉपरने मारहाण करून गंभीर जखमी करून त्यांचेकडील सुमारे १२१८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे—दागीने घेवुन पळुन गेले म्हणुन गुन्हा नोंद केला.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री अशोक मोहनलाल साकरीया, वय ५७ वर्षे, |
| **बळीत/मयत** | :— | श्री अशोक मोहनलाल साकरीया, वय ५७ वर्षे, |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | १) अयुब अलिमुददीन शेख ऊर्फ अयुब चिकना, वय ४७ वर्षे,<br>२) मो. शाहताज जमाल खान, वय ३७ वर्षे,<br>३) मारूती नवनाथ सोनावणे, वय ४६ वर्षे,<br>४) राकेश राजदेव जैस्वाल वय ३० वर्षे,<br>५) फैय्याज अहमद इक्बाल शेख उर्फ ताऊ वय २८ वर्षे,<br>६) पंकज छगनलाल सोनी वय—६२ वर्षे,<br>७) महेश पंकज सोनी वय—३२ वर्षे,<br>आरोपी क्र. १ ते ३ अटक दिनांक १२/०४/२०१९<br>आरोपी क्र. ४ अटक दिनांक १६/०४/२०१९<br>आरोपी क्र. ५ अटक दिनांक २३/०४/२०१९<br>आरोपी क्र. ६ व ७ अटक दिनांक २६/०४/२०१९ |
| **चोरीस गेलेला माल** | :— | ३६,२९०००/— रू.किं.चे सुमारे १२१८.११० ग्रॅम वजनाचे सोन्याचे विविध प्रकारचे दागीने (अंगठया, रिंगा, ब्रेसलेट, नेकलेस, सारा, बुटटी, कानचैन, पेंडन्टे इत्यादी) असलेली काळया रंगाची रेग्झीन बॅग, तसेच सदरची बॅग ही क्रीम रंगाची व किनार लाल रंगाची असलेली |

| | | |
|---|---|---|
| | | कापडी पिशवी ठेवलेली. |
| **हस्तगत केलेला माल** | :— | १) रु.४,३५,०००/—अंदाजे किंमतीचे अंदाजे १४५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (आरोपी अयुब अलिमुदिदन शेख उर्फ अयुब चिकना याच्याकडुन हस्तगत).<br>२) ३१,९३,०००/— रूपये किंमतीचे अंदाजे ४७५ ग्रॅम व ५५५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दोन लगड (आरोपी पंकज छगनलाल सोनी याच्याकडुन हस्तगत).<br>**(एकुण रु.३६,२८,०००/— अंदाजे किंमतीचे ११७५ ग्रॅम अंदाजे वजनाचे सोने.)** |

<u>**तपास कौशल्य**</u> :— सदर गुन्हा घडल्यावर तात्काळ गुन्हा नोंद करुन गुन्हयाचा तपास सुरु करण्यात आला. फिर्यादी पनवेलवरुन चिंचपोकळी येथे हातात सोन्याच्या दागिन्यांची पिशवी घेउन आले असल्याने त्यांच्याकडे तपास करुन काही दुवा मिळतो का? याचा प्रयत्न केला परंतु काहीही उपयुक्त माहिती मिळुन आली नाही.

घटना स्थळावरील व आसपासचे सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांचे फुटेज पाहिले असता, एकुण ३ मोटार सायकलवरुन ६ आरोपी घटनास्थळावर आले व जबरी चोरी करुन पळुन गेल्याचे निष्पन्न झाले परंतु फुटेजमध्ये मोटार सायकलचे क्रमांक मिळु शकले नाहीत.

फिर्यादी पनवेलवरुन आला असल्याने पनवेलपासुन चिंचपोकळीपर्यंत वेगवेगळया ठिकाणाचे डम्पडाटा काढण्यात आला. सदर डम्पडाटाचे विश्लेषण करण्यात आले असता एकुण ५ संशयीत मोबाईल क्रमांक मिळुन आले परंतु सदर ५ ही सीमकार्ड एकाच पत्त्यावरील असल्याने व पत्ता अपुर्ण असल्याने आरोपीचा शोध घेणे आणखी कठीण झाले. त्यानंतर सदर ५ ही मोबाईल क्रमांकाचे सी.डी.आर. काढले असता त्यांचे फक्त आपापसात संपर्क झाले असल्याचे व गुन्हा करुन झाल्यावर ते तात्काळ बंद झाल्याचे आढळुन आले. त्यामुळे सदर सीमकार्ड फक्त चोरी करण्याच्या उददेशानेच विकत घेतले असल्याचे निष्पन्न झाले व आरोपीचा शोध होणे फार कठीण होउन गेले. सदर ५ मोबाईल क्रमांकापैकी फक्त एका मोबाईल क्रमांकावरुन त्या ५ मोबाईल क्रमांकाव्यतिरीक्त अन्य दोन मोबाईल क्रमांकाशी संपर्क झालेला आढळुन आल्यावर लागलीच त्या दिशेने तपास सुरु केला व टॉवर लोकेशन तसेच एस.डी.आर. च्या मदतीने टिळकनगर पो. ठाणे हदिदत पोलीस पथकाने तपास सुरु केला व तपास कौशल्याचा वापर करुन संशयाच्या आधारावर मो. शाहताज आलम यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे कौशल्याद्वारे तपास केला असता, तो सदर गुन्हयात सहभागी असल्याचे आढळुन आले. त्यानंतर त्याच्यामार्फत आरोपी मारुती सोनावणे व मारुती सोनावणेमार्फत कुख्यात दरोडेखोर अयुब चिकना यास अटक केली आणि इतर साथीदार अटक केले. सीमकार्ड विक्रेता हया कटात सामील असल्याने त्यास अटक केली.

गुन्हयातील कटाचा सुत्रधार कुख्यात दरोडेखोर अयुब चिकना हा सराईत व निगरगठ्ठ असल्याने गुन्हयात त्याने चोरी केलेला माल हस्तगत करणे फार कठीण झाले. अयुब चिकना याने चोरीचा माल हस्तगत करण्यात सहकार्य न केल्याने पुन्हा बुध्दीकौशल्याने तपास करुन अयुब चिकना याच्या दुसऱ्या पत्नीचा मोबाईल क्रमांकाचा सी.डी.आर. प्राप्तकरुनगुन्हा घडल्यानंतर तीने संपर्क केलेल्या लोकांची पडताळणी करण्यास सुरुवात केली. त्यामध्ये एक इसम सोन्याचे दागिने विक्री करणारा सोनार असल्याचे आढळुन आले. त्यामुळे त्यास संशयीत म्हणुन ताब्यात घेउन कसुन तपास केला असता, त्याने अयुब चिकना व त्याची दुसरी पत्नी पाहिजे आरोपी संगिता नायर यांच्याकडुन यातील चोरीचे सोन्याचे दागिने विकत घेतल्याचे निष्पन्न झाले. अशा तऱ्हेने नमुद गुन्हयात अदयापपर्यंत ७ आरोपी अटक व चोरीस गेलेल्या १२०० ग्रॅम सोन्यापैकी एकुण

११७५ ग्रॅम सोने हस्तगत करण्यात आले आहे व चोरीस गेलेल्या मालमत्तेच्या ९९ टक्के मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

- सदरचा संवेदनशील गुन्हा उघड झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी माहे **एप्रिल—२०१९** चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

**काळाचौकी पोलीस ठाणे**

**परिमंडळ—४, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ. क्र. | हुद्दा | संपुर्ण नांव |
|---|---|---|
| १ | वरिष्ठ पो.निरीक्षक | सौ. मृदुला महेश लाड, |
| २ | पोलीस निरीक्षक | सचिन शांताराम हिरे, |
| ३ | सहाय्यक पो. निरीक्षक | श्रीरंग बापु सणस, |
| ४ | सहाय्यक पो. निरीक्षक | अजय नंदकुमार चव्हाण, |
| ५ | पोलीस उप निरीक्षक | रामदास तात्याबा कदम |
| ६ | पोलीस उप निरीक्षक | सिध्दनाथ मारुती खांडेकर, |
| ७ | पोलीस उप निरीक्षक | घनश्याम सुरेश बोरसे, |
| ८ | पोलीस उप निरीक्षक | सचिन विठठल पाटणे, |
| ९ | पो.शि.क्र.३३४०९ | इक्बाल संतोष सिंग |
| १० | पो.शि.क्र. ९७०२३९ | सुनिल मंगेश पाटील, |
| ११ | पो.शि.क्र. ०९३७२५ | मुबारक हनिफ सय्यद |

✿✿✿✿✿✿✿